जनसपर्क कक्ष
2 6 NOV 2025 काळ' अवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर देण्याच्या भूमिकेत भारत

काशिनाथ देवधर : विद्यापीठात 'मीट द सायंटिस्ट' उपक्रम

कोल्हापूर, ता. २५ : 'ऑपरेशन सिंदूर' हे भारताने थांबविलेले नसून, जोवर दहशतवादी कृत्ये सुरू राहतील, तोपर्यंत या मोहिमेंतर्गत पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर देण्याच्या भूमिकेत भारत असल्याचे प्रतिपादन पुण्याच्या संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेचे निवृत्त समूह संचालक काशिनाथ देवधर यांनी आज येथे केले.

काशिनाथ देवधर

शिवाजी विद्यापीठाचे इन्स्टिट्यूशन्स इनोव्हेशन कौन्सिल, स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी आणि स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी यांच्यातर्फे आयोजित 'मीट द सायंटिस्ट' या उपक्रमांतर्गत 'ऑपरेशन सिंदूर आणि आत्मनिर्भर भारत' या विषयावर आयोजित विशेष व्याख्यानात देवधर बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव होत्या.

यावेळी स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीचे संचालक डॉ. अजित कोळेकर, क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, शासकीय पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ. नितीन सोनजे, प्रवीणकुमार पाटील उपस्थित होते. डॉ. प्रमोद पाटील यांनी स्वागत केले. डॉ. हर्षवर्धन पंडित यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. दीप्ती कुऱ्हे यांनी आभार मानले.

संरक्षण क्षेत्रात भारत आत्मनिर्भर

■ 'आज देशात संरक्षणविषयक एक लाख २७ हजार कोटी रुपये मूल्याचे उत्पादन होते. त्यामध्ये २३ हजार ६२२ कोटी रुपयांच्या निर्यातीचाही समावेश आहे. पुढील पाच वर्षांत हे उत्पादन तीन लाख कोटी रुपयांवर जाईल. निर्यातही त्याच प्रमाणात वाढेल. अत्याधुनिक शस्त्रास्त्रांचे उत्पादन भारत करीत असून, या प्रगतीने जगाचे डोळे दिपवले आहेत. संरक्षण क्षेत्रामध्ये भारत अत्याधुनिक स्वदेशी तंत्रज्ञानाने आत्मनिर्भर झाला असून, आता तो आयातदार राहिलेला नसून, मोठ्या प्रमाणात निर्यातदार देश बनला असल्याचे देवधर यांनी सांगितले.

2 6 NOV 2025

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

संरक्षण क्षेत्रात भारत आत्मनिर्भर

काशिनाथ देवधर; विद्यापीठात 'ऑपरेशन सिंदूर आणि आत्मनिर्भर भारत'वर व्याख्यान

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

संरक्षण क्षेत्रामध्ये भारत अत्याधुनिक स्वदेशी तंत्रज्ञानाने आत्मनिर्भर झाला आहे. आता तो आयातदार राहिलेला नसून मोठ्या प्रमाणात निर्यातदार देश बनला आहे, असे प्रतिपादन पुण्याच्या संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेचे निवृत्त समूह संचालक काशिनाथ देवधर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे इन्स्टिट्यूशन्स इनोव्हेशन कौन्सिल, स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी आणि स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने 'मीट द सायंटिस्ट' या उपक्रमांतर्गत 'ऑपरेशन सिंदूर आणि आत्मनिर्भर भारत' या विषयावर आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव अध्यक्षस्थानी होत्या.

देवधर म्हणाले, काही वर्षांपूर्वीपर्यंत भारत हा संरक्षण क्षेत्राशी निगडित सामग्री आयात करणारा देश होता. मात्र, आता चित्र पालटले असून आज देशात संरक्षणविषयक १ लाख २७ हजार कोटी रुपये मूल्याचे उत्पादन होते. त्यामध्ये २३ हजार ६२२ कोटी रुपयांच्या निर्यातीचाही समावेश आहे. पुढील पाच वर्षांत हे उत्पादन ३ लाख कोटी रुपयांवर जाईल. निर्यातही त्याच प्रमाणात वाढेल. 'ऑपरेशन सिंदूर' हे भारताने थांबविलेले नसून जोवर दहशतवादी कृत्ये सुरू राहतील, तोवर या मोहिमेअंतर्गत पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर देण्याच्या भूमिकेत देश असल्याचे देवधर यांनी सांगितले.

प्र-कुलगुरू डॉ. जाधव म्हणाल्या, देवधर यांनी डीआरडीओसारख्या संस्थेमध्ये अतिशय जबाबदारीच्या पदांवर संशोधक म्हणून कामाचा ठसा उमटविला आहे.

डॉ. प्रमोद जे. पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. हर्षवर्धन पंडित यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. दीप्ती कुऱ्हे यांनी आभार मानले. कार्यक्रमास स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीचे संचालक डॉ. अजित कोळेकर, क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. रामचंद्र पवार, प्राचार्य डॉ. नितीन सोनजे, डॉ. प्रवीणकुमार पाटील उपस्थित होते.

2 6 NOV 2025

दै. जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

भारत अत्याधुनिक स्वदेशी तंत्रज्ञानाने आत्मनिर्भर

संरक्षण संशोधन विकास संस्थेचे निवृत्त समूह संचालक काशीनाथ देवधर यांचे प्रतिपादन: दहशतवादाला कठोर प्रत्युत्तर देणार

जनप्रवास : कोल्हापूर

संरक्षण क्षेत्रामध्ये भारत अत्याधुनिक स्वदेशी तंत्रज्ञानाने आत्मनिर्भर झाला असून आता तो आयातदार राहिलेला नसून मोठ्या प्रमाणात निर्यातदार देश बनलेला आहे, असे प्रतिपादन पुण्याच्या संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेचे निवृत्त समूह संचालक काशीनाथ देवधर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे इन्स्टिट्यूशन्स इनोव्हेशन कौन्सिल, स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी आणि स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने 'मीट द सायंटिस्ट' या उपक्रमांतर्गत 'ऑपरेशन सिंदूर आणि आत्मनिर्भर भारत' या विषयावर आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते. विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव अध्यक्षस्थानी होत्या.

शिवाजी विद्यापीठातील आयोजित व्याख्यानात मार्गदर्शन करताना निवृत्त समूह संचालक काशीनाथ देवधर. सोबत डॉ. हर्षवर्धन पंडित, डॉ. प्रमोद पाटील, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, डॉ. अजित कोळेकर आणि डॉ. दीप्ती कुर्हे.

देवधर म्हणाले, काही वर्षांपूर्वीपर्यंत भारत हा संरक्षण क्षेत्राशी निगडित सामग्री आयात करणारा देश होता. मात्र, आता चित्र पालटले असून आज देशात संरक्षणविषयक एक लाख २७ हजार कोटी रुपये मूल्याचे उत्पादन होते. त्यामध्ये २३ हजार ६२२ कोटी रुपयांच्या निर्यातीचाही समावेश आहे.

ते पुढे म्हणाले, पुढील पाच वर्षांत हे उत्पादन ३ लाख कोटी रुपयांवर जाईल. निर्यातही त्याच प्रमाणात वाढेल. भूमी, वायु, जल, आकाश आणि अवकाश अशा सर्व ठिकाणी वापरावयाच्या अत्याधुनिक शस्त्रास्त्रांचे उत्पादन भारत करीत असून या प्रगतीने जगाचे डोळे दिपवले असल्याचे त्यांनी सांगितले. ऑपरेशन सिंदूर हे भारताने थांबविलेले नसून जोवर दहशतवादी कृत्ये सुरू राहतील, तोवर या मोहिमेअंतर्गत पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर देण्याच्या भूमिकेत देश असल्याचे देवधर यांनी सांगितले. यापुढे भारतावरील कोणताही दहशतवादी हल्ला हा युद्धाची कृती समजली जाईल आणि दहशतवादी आणि दहशतीला प्रोत्साहन वा आश्रय देणारे राष्ट्र यामध्ये भेद न करता कठोर प्रत्युत्तर दिले जाईल, असा सज्जड इशारा पाकिस्तानला दिल्याचेही त्यांनी सांगितले.

अध्यक्षस्थानावरून बोलताना प्र-कुलगुरू डॉ. जाधव म्हणाल्या, देवधर यांनी डीआरडीओसारख्या संस्थेमध्ये अतिशय जबाबदारीच्या पदांवर संशोधक म्हणून आपल्या कामाचा ठसा उमटविला आहे. तेथील कामाचे अनुभव त्यांनी अतिशय उत्कृष्ट व सोप्या पद्धतीने विद्यार्थ्यांना सांगितले. त्यांच्या या व्याख्यानामुळे विद्यार्थ्यांच्या मनात देशाभिमानाची ठिणगी निश्चितपणे प्रज्वलित होईल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

डॉ. प्रमोद जे. पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. हर्षवर्धन पंडित यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. दीप्ती कुर्हे यांनी आभार मानले. स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीचे संचालक डॉ. अजित कोळेकर, क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, शासकीय पॉलिटेक्निक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन सोनजे, डॉ. प्रवीणकुमार पाटील यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

2 6 NOV 2025

सिंधुदुर्ग समाचार

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

संरक्षण क्षेत्रात भारत अत्याधुनिक तंत्रज्ञानाने आत्मनिर्भर : काशीनाथ देवधर

कोल्हापूर/प्रतिनिधी : संरक्षण क्षेत्रामध्ये भारत अत्याधुनिक स्वदेशी तंत्रज्ञानाने आत्मनिर्भर झाला असून आता तो आयातदार राहिलेला नसून मोठ्या प्रमाणात निर्यातदार देश बनलेला आहे, असे प्रतिपादन पुण्याच्या संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेचे निवृत्त समूह संचालक काशीनाथ देवधर यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचे इन्स्टिट्यूशन्स इनोव्हेशन कौन्सिल, स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी आणि स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने 'मीट द सायंटिस्ट' या उपक्रमांतर्गत 'ऑपरेशन सिंदूर आणि आत्मनिर्भर भारत' या विषयावर आयोजित विशेष व्याख्यानात श्री. देवधर बोलत होते. विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव अध्यक्षस्थानी होत्या.

श्री. देवधर यांनी आपल्या भाषणात भारताच्या संरक्षण क्षेत्रातील वाटचालीचा सविस्तर आढावा घेताना त्यामध्ये संरक्षण संशोधन व विकास संस्थेचे योगदान विषद केले. ते म्हणाले, काही वर्षांपूर्वीपर्यंत भारत हा संरक्षण क्षेत्राशी निगडित सामग्री आयात करणारा देश होता. मात्र, आता चित्र पालटले असून आज देशात संरक्षणविषयक एक लाख २७ हजार कोटी रुपये मूल्याचे उत्पादन होते. त्यामध्ये २३ हजार ६२२ कोटी रुपयांच्या निर्यातीचाही समावेश आहे. पुढील पाच वर्षांत हे उत्पादन ३ लाख कोटी रुपयांवर जाईल. निर्यातही त्याच प्रमाणात वाढेल. भूमी, वायू, जल, आकाश आणि अवकाश अशा सर्व ठिकाणी वापरावयाच्या अत्याधुनिक शस्त्रास्त्रांचे उत्पादन भारत करीत असून या प्रगतीने जगाचे डोळे दिपवले असल्याचे त्यांनी सांगितले.

ऑपरेशन सिंदूर हे भारताने थांबविलेले नसून जोवर दहशतवादी कृत्ये सुरू राहतील, तोवर या मोहिमेअंतर्गत पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर देण्याच्या भूमिकेत देश असल्याचे देवधर यांनी सांगितले. यापुढे भारतावरील कोणताही दहशतवादी हल्ला हा युद्धाची कृती समजली जाईल आणि दहशतवादी आणि दहशतीला प्रोत्साहन वा आश्रय देणारे राष्ट्र यामध्ये भेद न करता कठोर प्रत्युत्तर दिले जाईल, असा सज्जड इशारा पाकिस्तानला दिल्याचेही त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय मनोगतात प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव म्हणाल्या, देवधर यांनी डीआरडीओसारख्या संस्थेमध्ये अतिशय जबाबदारीच्या पदांवर संशोधक म्हणून आपल्या कामाचा ठसा उमटविला आहे. तेथील कामाचे अनुभव त्यांनी अतिशय उत्कृष्ट व सोप्या पद्धतीने विद्यार्थ्यांना सांगितली. त्यांच्या या व्याख्यानामुळे विद्यार्थ्यांच्या मनात देशाभिमानाची ठिणगी निश्चितपणे प्रज्वलित होईल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

यावेळी डॉ. प्रमोद जे. पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. हर्षवर्धन पंडित यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. दीप्ती कुऱ्हे यांनी आभार मानले. कार्यक्रमास स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीचे संचालक डॉ. अजित कोळेकर, क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, शासकीय पॉलिटेक्निक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन सोनजे, डॉ. प्रवीणकुमार पाटील यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

2 6 NOV 2025
सकाळ

यशवंतराव चव्हाण यांना अभिवादन

कोल्हापूर : यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट येथे यशवंतरावांना अभिवादन करताना उपस्थित मान्यवर.

शिवाजी विद्यापीठ स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट

कोल्हापूर : महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट येथे यशवंतराव चव्हाण अध्यासनातर्फे त्यांना आदरांजली वाहिली. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते यशवंतरावांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. यावेळी डेव्हलपमेंटचे संचालक डॉ. नितीन माळी, अध्यासनाचे समन्वयक डॉ. गजानन साळुंखे, डॉ. सुधीर देसाई, डॉ. अमोल मिणचेकर, डॉ. वैशाली भोसले, डॉ. कविता वड्राळे, डॉ. संतोष सुतार, चेतन गळगे, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

26 NOV 2025

तरुण भारत

शिवाजी विद्यापीठात यशवंतराव चव्हाण यांना अभिवादन

कोल्हापूर : माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट येथे यशवंतराव चव्हाण अध्यासनातर्फे आदरांजली वाहण्यात आली. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंटचे संचालक डॉ. नितीन माळी, अध्यासनाचे समन्वयक डॉ. गजानन साळुंखे, डॉ. सुधीर देसाई, डॉ. अमोल मिणचेकर, डॉ. वैशाली भोसले, डॉ. कविता वड्राळे, डॉ. संतोष सुतार, चेतन गळगे आदी उपस्थित होते.

2 6 NOV 2025 दै. जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

यशवंतराव चव्हाण यांना विद्यापीठात आदरांजली

कोल्हापूर : महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट येथे यशवंतराव चव्हाण अध्यासनातर्फे त्यांना आदरांजली वाहण्यात आली. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंटचे संचालक डॉ. नितीन माळी, अध्यासनाचे समन्वयक डॉ. गजानन साळुंखे, डॉ. सुधीर देसाई, डॉ. अमोल मिणचेकर, डॉ. वैशाली भोसले, डॉ. सचिन वड्राळे, डॉ. संतोष सुतार, चेतन गळगे आदींसह विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

2 6 NOV 2025

ग्लोबल टाइम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

यशवंतराव चव्हाण यांना शिवाजी विद्यापीठात आदरांजली

कोल्हापूर : महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट येथे यशवंतराव चव्हाण अध्यासनातर्फे त्यांना आदरांजली वाहण्यात आली. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटचे संचालक डॉ. नितीन माळी, अध्यासनाचे समन्वयक डॉ. गजानन साळुंखे, डॉ. सुधीर देसाई, डॉ. अमोल मिणचेकर, डॉ. वैशाली भोसले, डॉ. कविता वड्राळे, डॉ. संतोष सुतार, चेतन गळगे आदींसह विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

2 6 NOV 2025
पुढारी

विद्यापीठात आज 'संविधान जागर' अंतर्गत व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'संविधान जागर' व्याख्यानमालेअंतर्गत बुधवारी (दि. २६) ज्येष्ठ राजकीय विचारवंत डॉ. प्रकाश पवार यांचे 'भारतीय संविधानातील विशेष तरतुदी' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. भारतीय संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र आणि जनसंपर्क कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने 'संविधान जागर' ही वार्षिक व्याख्यानमाला आयोजित केली आहे.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 6 NOV 2025

तरुण भारत

विद्यापीठ परीक्षेतील १० अभ्यासक्रमाचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर, नोव्हेंबर – २०२५ हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर परीक्षेत मंगळवारी १० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले असून आजअखेर २४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी परीक्षा ३ नोव्हेंबरपासून सुरु झाल्या आहेत. याअंतर्गत ७७ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने १६३ परीक्षा केंद्रावर पार पडल्या आहेत. सदर परीक्षांसाठी २४,३११ विद्यार्थी उपस्थित होते. विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. सदर पथकाकडून मंगळवारी कोल्हापूर ४ आणि सांगली १ अशा एकूण ५ गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आली आहे. परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी केले आहे.

26 NOV 2025
पुढारी

विधी शाखेतील कॅरीऑनच्या विद्यार्थ्यांना परीक्षेस बसण्यास परवानगी

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

विधी शाखेतील कॅरीऑनच्या विद्यार्थ्यांना परीक्षेस परवानगी द्या, असे आदेश कोल्हापूर सर्किट बेंचने मंगळवारी (दि. २५) दिले. तसेच २४ व २५ नोव्हेंबरला ज्यांना परीक्षा देता आली नाही, त्यांच्यासंदर्भात ८ डिसेंबरला होणाऱ्या सुनावणीत निर्णय होणार आहे.

मुंबई उच्च न्यायालयातील एका खटल्याचा आधार घेत शिवाजी विद्यापीठाने विधी शाखेच्या कॅरीऑनच्या विद्यार्थ्यांना परीक्षेस बसण्यास परवानगी नाकारली होती. त्याविरुद्ध सुधाकर रवंडे (रा. चंदूर, ता. हातकणंगले) यांनी अॅड. सौरभ तांदळे, अॅड. केतन पोटे यांच्या माध्यमातून जनहित याचिका दाखल केली आहे. विद्यापीठाने चुकीचा अर्थ काढून अध्यादेश काढला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार आहे. वास्तविक यापूर्वीच विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रक्रिया पूर्ण केली आहे. त्यांचे परीक्षा फॉर्म भरून घेतले आहेत. त्यांची व्हायवा घेतली असून इतर परीक्षाही घेतल्या आहेत, असा युक्तिवाद याचिकाकर्त्यांच्या वतीने केला आहे. न्यायालयाच्या निर्णयामुळे शहाजी विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.

2 6 NOV 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

गतवर्षातील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना हिवाळी परीक्षेत बसण्याची परवानगी

प्रतिनिधी
कोल्हापूर

अभ्यास मंडळे विभागाच्या २०/०९/२०२४ अन्वये अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना विशेष प्रवेश संधी देण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना यंदाच्या हिवाळी परीक्षेत बसण्याची परवानगी शिवाजी विद्यापीठाने दिली आहे. याबाबत सर्किट बेंचने दिलेल्या आदेशानुसार शिवाजी विद्यापीठाकडून कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

याबाबतच आदेश शिवाजी विद्यापीठाला सोमवारी प्राप्त झाला. अभ्यास मंडळे विभागाचे पत्रानुसार २०/०९/२०२४ अन्वये अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना विशेष प्रवेश संधी अंतर्गत पुढील सत्रात तात्पुरता प्रवेश देऊन हिवाळी सत्र २०२५ ची परीक्षा देण्यास परवानगी देण्यात आली आहे. सदरची विशेष प्रवेश संधी चा फायदा देता येत नसल्यामुळे परिपत्रकास अनुसरून तात्पुरते प्रवेश घेऊन हिवाळी सत्र २०२५ मध्ये जे विद्यार्थी परीक्षा देणार आहेत.

न्यायालयाच्या अंतरिम आदेशानुसार विशेष प्रवेश संधी अंतर्गत विद्यार्थ्यांना तात्पुरता प्रवेश घेऊन हिवाळी सत्रात बुधवार दि. २६ रोजीपासून सुरु असणाऱ्या परीक्षा देण्यास परवानगी देण्यात यावी, असे आदेश दिले आहेत. न्यायालयाच्या अंतरिम आदेशानुसार विशेष प्रवेश अंतर्गत तात्पुरता प्रवेश घेऊन हिवाळी सत्र २०२५ मध्ये परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांचे निकाल राखीव ठेवण्यात येतील आणि सदरच्या निकालाबाबत अंतिम निर्णय हा उपरोक्त याचिकेबाबत होणाऱ्या निकालानुसार होईल, असेही सांगण्यात आले आहे. या निर्णयाची अंमलबजावणी करावी अशा सूचना संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळकडून विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालय, अधिविभागातील सर्व संबंधित विद्यार्थ्यांना केल्या आहेत.

2 6 NOV 2025

सकाळ

शिवाजी विद्यापीठाच्या काजोलला सुवर्णपदक

जयपूर : राजस्थानात सुरू झालेल्या खेलो इंडिया विद्यापीठ क्रीडा स्पर्धेतील पहिले सुवर्णपदक गुरुनानक देव विद्यापीठाच्या मीनाक्षी रोहिल्लाने महिलांच्या वैयक्तिक टाइम ट्रायल प्रकारात जिंकले. ती बऱ्याच कालावधीनंतर पुनरागमन करीत आहे. आता ती रोड रेस शर्यतीत सहभागी होणार आहे. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरच्या काजोल सरगरने वेटलिफ्टींगमधील महिलांच्या ४८ किलो वजन गटात सुवर्णपदकाला गवसणी घातली. नेमबाजीतील महिलांच्या १० मीटर एअर रायफल प्रकारात प्रोफेशनल विद्यापीठाच्या साक्षी पडेकरने सुवर्णपदक जिंकले. खेलो इंडिया विद्यापीठ क्रीडा स्पर्धेत सायकलिंगचा प्रथमच समावेश करण्यात आला आहे.

2 6 NOV 2025
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ फुटबॉल स्पर्धेत शिवराज महाविद्यालय तृतीय

गडहिंग्लज : प्रतिनिधी

कराड येथे झालेल्या दौलतराव आहेर इंजि. कॉलेज येथे शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय फुटबॉल स्पर्धेत शिवराज महाविद्यालयाच्या पुरुष संघाने तृतीय क्रमांक पटकावला. हे यश संपादन करण्यासाठी साखळी फेरीमध्ये अण्णासाहेब डांगे कॉलेज आष्टा या संघाचा ४-० अशा गोल फरकाने पराभव करत विजय मिळवला. तसेच गव्हर्न्मेंट कॉलेज ऑफ इंजि. कराड या संघावर २-० गोल फरकाने विजय मिळवत उपांत्य फेरीत प्रवेश केला. तृतीय क्रमांकाच्या सामन्यामध्ये बलाढ्य एस. बी. एम. कॉलेज रहिमतपूर संघाचा ३-० अशा गोलफरकाने एकतर्फी विजय मिळवत तृतीय क्रमांक पटकावला.

गडहिंग्लज : शिवाजी विद्यापीठ फुटबॉल स्पर्धेत यश मिळवलेला शिवराज महाविद्यालयाचा फुटबॉल संघ. उपस्थित मान्यवर.

विजयी खेळाडूंना शिवराज विद्या संकुलाचे अध्यक्ष प्रा. किसन कुराडे, सचिव डॉ. अनिल कुराडे, उपाध्यक्ष ॲड. दिग्विजय कुराडे, संचालिका प्रा. बिनादेवी कुराडे, संचालक प्रा. विश्वजित कुराडे, प्राचार्य डॉ. एस. एम. कदम यांचे प्रोत्साहन, तर क्रीडाशिक्षक डॉ. राहुल मगदूम, प्रा. जयवंत पाटील, किरण कावणेकर यांचे मार्गदर्शन लाभले.

महाविद्यालयाच्या फुटबॉल संघातील खेळाडू असे- कुपिंदर पोवार, सूरज कोंडूस्कर, श्रावण जाधव, सौरभ हुलसार, सौरभ मोहिते, अमर गवळी, मारुती कोळी, ओमकार बेळगुंदकर, आर्यन दळवी, सागर पोवार, राहुल पोवार, यश खोत, प्रसाद पोवार, ओमकार पाटील, प्रवीण पोवार, तेजस शेंडे, तुषार कांबळे, प्रशांत सलवादे, आकाश देसाई, संदीप हिरेकुडी आदी.

2 6 NOV 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

क्रांतिकारी शोध

(पु) डॉ. व्ही.एन. शिंदे

ड्रोन : शापित वरदान!

कोरोना काळ हा अलीकडच्या काळातील अत्यंत कठीण काळ. त्याकाळात काही ठिकाणी औषधे पाठविणे कठीण होते, तेथे एका चिमुकल्या उपकरणाने कमाल केली. औषधे पोहोचवल्याने अनेक रुग्णांचे जीव वाचले. असे अत्यंत उपयुक्त ठरलेले उपकरण म्हणजे ड्रोन.

ड्रोन म्हणजे मानवविरहीत हवेतून चालणारे (Unmanned Aerial Vehicle-UAV), दूरवरून नियंत्रित केले जाणारे (Remotely Piloted Vehicle–RPV) स्वयंचलित विमान. मानवविरहीत उपकरणाच्या सहाय्याने एका जागेवरून दुसऱ्या जागेवर साहित्य पोहोचवण्याचा प्रयत्न काही अलीकडे झालेला नाही. जुलै १८४९ मध्ये पहिल्यांदा बलूनचा वापर ऑस्ट्रियन सैन्यदलाने केला होता. साधारण २०० बलूनमधून २४ ते ३० पौंड वजनाचे बॉंब काही जमिनीवरून तर काही जहाजातून पाठवण्यात आले होते. मात्र, हवेच्या दिशा बदलण्यामुळे बहुतांश बलून निश्चित केलेल्या ठिकाणावर बॉंब टाकू शकले नाहीत. काही तर त्याच जहाजावर परत आले.

पुढे पहिले मानवविरहीत विमान बनवण्याचे प्रयत्न पहिल्या महायुद्धात झाले. दूरचित्रवाणी आणि रेडिओ संदेशवहनासाठी वापरण्यात येणाऱ्या तरंगांचा वापर विमानांना नियंत्रित करण्यासाठी वापरता येतील हे ब्रिटिश संशोधक ए. एम. लो यांच्या लक्षात आले. त्यांना असे विमान बनवण्यात १९१७ मध्ये यश मिळाले. लो यांनी अशा पहिल्या विमानाचे उड्डाण २१ मार्च १९१७ रोजी केले. तरंगाचा वापर करून अशी उपकरणे बनवण्यामध्ये लो यांचा हात कोणी धरू शकत नव्हते. त्यांनाच ड्रोनचा जनक मानले जाते. पुढे लवकरच ड्रोनचा वापर युद्धामध्ये अचूक हल्ला करण्यासाठी होऊ शकतो हे लक्षात आले. नोव्हेंबरमध्ये अमेरिकेतही असे विमान बनवण्यात आले. याला एरियल टोर्पेडो म्हणत. यातील केटरिंग बग हे ड्रोन १९१८ मध्ये उडविण्यात आले. अर्थात, हे तंत्रज्ञान विकसित होईपर्यंत पहिले महायुद्ध संपले. युद्ध संपले तरी संशोधकांनी शोध काही थांबवले नव्हते. इंग्लंडमध्ये रॉयल नेव्ही सातत्याने ड्रोनची मॉडेल विकसीत करत होते. १९२९ पर्यंत यामध्ये मोठी प्रगती झाली. १९३०-३१ मध्ये इंग्लंडने फेअरी बीच्या सहाय्याने मानवविरहीत विमाने बनवली. तोपर्यंत ड्रोनना माशी, राणी माशी या नावानेच ओळखले जात होते. याला ड्रोन हे नाव अमेरिकन हवाई दलाने दिले. हंगेरीतील संशोधक कलमान तिहानई दूरचित्रवाणीच्या संदेशांचा वापर करावयाचे आणि त्यांनी ड्रोनवर कॅमेरा बसवण्याचे तंत्र विकसित केले. त्यांनी ते तंत्रज्ञान इटालियन नौदलाला दिले. पुढे त्यांनीच इन्फ्रारेड संवेदक, रात्री पाहू शकेल असा कॅमेरा ड्रोनवर बसवला. इंग्लंडमधील ड्रोनमध्येही त्यांनी तसेच कॅमेरे बसवून दिले. लाल भिंतीआड १९३५ ते १९३९ या कालखंडात रशियाने अशा प्रकारच्या ड्रोनचा वापर अतिथंड आणि डोंगराळ भागात साहित्य पोहोचवण्यासाठी यशस्वीपणे केला. ब्रिटिश नेव्हीमध्ये सेवा बजावून निवृत्त झालेल्या रेजिनाल्ड डेनी यांनी एकाचवेळी अनेक ड्रोनचे उत्पादन करण्यासाठी उद्योग उभारण्याचे ठरवले. निवृत्तीनंतर ते अमेरिकेत जाऊन हॉलिवूडमध्ये अभिनय करू लागले होते. मात्र, १९३० मध्ये त्यांना ड्रोनमध्ये पुन्हा रूची निर्माण झाली. त्यांनी पाच वर्षातच अमेरिकन सैन्यदलाला ड्रोनचा युद्धात प्रभावीपणे वापर करण्याचे प्रात्यक्षिक दाखवले. पहिल्या मॉडेलमध्ये अनेक सुधारणा करत त्यांनी बनवलेल्या मॉडेलबाबत अमेरिकन सैन्यदलाने १९४० मध्ये करार केला. त्यांनी दुसऱ्या महायुद्धाच्या काळात १५,००० ड्रोन बनवले. मात्र दूरवरून वळवणे, उंचावर जाणे, खाली येणे, गती वाढवणे यावर संपूर्ण नियंत्रण असणारे ड्रोन बनवण्याचे श्रेय एडवर्ड एम. सोरेनसेन यांना जाते. लवकरच १००० पौंड वजन नेईल असे ड्रोन तयार करण्यात आले. अचूक मारा करण्याचे प्रात्यक्षिक १९४२ मध्ये दाखवण्यात आले. दुसऱ्या महायुद्धात ड्रोनने महत्त्वाची भूमिका निभावली. मात्र, १००० ड्रोनचेही नुकसान झाले, त्यामुळे सैन्यदलात मतभेद झाले. तरीही ड्रोनचा विकास थांबला नाही. १९४४ मध्ये त्रुटी दूर करून नवे ड्रोन बनवण्यात आले. त्यानंतर थेट क्षेपणास्त्रे बनवण्यात आले. त्यांना रेल्वे, जहाज, जमिनीवरून उडवता येत होते. अडीचशे किलोमीटरपर्यंत ६४० किलोमीटर प्रती तास, वेगाने उड्डाण करता येत होते. तिकडे जपानने फुगो बलूनच्या सहाय्याने अमेरिकेच्या प्रांतात जंगलांना पेटवण्यासाठी हल्ले केले. युद्धानंतरही ड्रोनचा विकास सुरू होता. कंबशन इंजिन वापरून बनवलेल्या ड्रोन्सनी एक काळ गाजवला. ड्रोन्सचा वापर इतर कारणासाठीही होऊ शकतो हे जसजसे लक्षात येऊ लागले, तशी संशोधनाने गती पकडली. रशियाने तर अनेक मॉडेल्स बनवली. ड्रोन्सचा अमेरिकेने व्हिएतनाम युद्धात मोठ्या प्रमाणात वापर केला. सुरुवातीला ड्रोन्सचा आकार मोठा होता. पुढे त्यांचा आकार लहान होत एखाद्या पक्ष्याच्या आकाराची ड्रोन अस्तित्वात आली. व्हिएतनाम युद्धामध्ये अमेरिकेच्या ड्रोनला मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. मात्र, तोपर्यंत अनेक राष्ट्रांनी ड्रोन संशोधनास सुरुवात केली. जपान, चीन आणि इस्रायल यांनी ड्रोनचा वापर समाजाच्या भल्यासाठी कसा करता येईल यावर लक्ष केंद्रित केले. १९७० ते १९८० या कालखंडात इस्रायलसारख्या राष्ट्रांनी मात्र त्याचा सैनिकी उपयोग काही सोडला नाही. १९८२ मध्ये इस्रायलने सिरियाविरुद्ध युद्धात ड्रोनचा वापर मोठ्या प्रमाणात केला. त्यानंतर अमेरिकेने पुन्हा ड्रोन विकासावर भर देण्यास सुरुवात केली. १९९० पर्यंत अगदी अचूक मारा करणारे ड्रोन विकसित करण्यात आली. यातील एमक्यू-१ प्रीडेटर हे सर्वात प्रभावी ठरले. तिसऱ्या औद्योगिक क्रांतीपर्यंत ड्रोनमध्ये सुधारणांची गती कमी होती. मात्र, संगणक आणि आंतरजालाच्या निर्मितीनंतर जीपीएस तंत्रज्ञानाच्या उपलब्धतेनंतर ड्रोन विकासाने गती पकडली. तसेच अत्यंत हलक्या आणि टिकाऊ अशा मिश्रधातूंच्या शोधानेही ड्रोन विकासाला गती दिली. कॅमेरा तंत्रज्ञानामध्येही मोठ्या सुधारणा झाल्या आणि स्वप्नवत अचूकता आली. दहशतवाद, नक्षलवाद आणि युद्धांमध्ये ड्रोनचा प्रभावी वापर सुरू झाला. फेडरल एव्हिएशन ॲडमिनिस्ट्रेशनने २००६ सालापासून यासाठी परवाने देण्यास सुरुवात केली. ड्रोनचा साहित्य पोहोचवण्यासाठी व्यावसायिक वापर सुरू झाला.

छायाचित्रण, हेरगिरी यासाठी अगदी छोटे ड्रोन बनवण्याचे यशस्वी प्रयत्न झाले. त्याचप्रमाणे साहित्याचे वितरण करण्यासाठी, एका जागेवरून दुसऱ्या जागेवर साहित्य पाठविण्यासाठी ड्रोनचा आकार आणि कार्यक्षमता वाढवण्यावर भर देण्यात आला. आजही तसेच प्रयत्न होत आहेत. २०१० पासून या प्रयत्नांनी गती घेतली आणि आज अगदी चिमणीच्या आकाराचे ड्रोन्स विकसित करण्यात आले आहेत. ड्रोनची निर्मिती युद्धामध्ये होणारी आर्थिक आणि जीवित हानी टाळण्यासाठी तसेच शत्रूचे नुकसान करण्यासाठी झाला. मात्र, या शोधाने आज कोरोनासारख्या संकटात मानवतेची सेवा केली. त्याचा आजही विघातक कारणासाठी वापर होत असला तरी त्याचे मानवतेची सेवा करणारे ड्रोन अत्यंत महत्त्वाचे साधन बनले आहे.

लेख ऐकण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

संपर्क : ९६७३७८४४००